# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ३०/०१/२०२५ (गुरूवार)

### अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**पोस्टे खापरखेडा** :— दिनांक २९/०१/२०२५ रोजी खापरखेडा पोलीस हे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की अवैधरीत्या विनापरवाना रेती वाहतुक केली जात आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून रेल्वे चौकी खापरखेडा येथे नाकाबंदी केली असता असता ट्रक क्र. एमएच ४०— सीडी — ३६५० यास थांबवुन पाहणी केली असता चालक नामे शंभु सुरेशकुमार कुनजामे वय ३३ वर्ष रा. दत्तनगर चनकापूर हा मिळुन आला तसेच ट्रक मध्ये ०१ ब्रास रेती कि.४०००/—रू असल्याचे आढळुन आले. चालकाला परवान्याबाबत विचारपुस केली असात त्याने परवाना नसल्याचे सांगितले. **आरोपीच्या ताब्यातील ट्रक क्र. एमएच ४०— सीडी — ३६५० किमंती २,४०,०००/— रू मध्ये ०१ ब्रास रेती कि.४०००/—रू असा एकूण २,४४,०००/—रू चा पंचासमक्ष मुद्देमाल जप्त केला.**

चालक आरोपी नामे शंभु सुरेशकुमार कुनजामे वय ३३ वर्ष रा. दत्तनगर चनकापूर यांच्या विरुद्ध पोलीस ठाणे खापरखेडा येथे कलम कलम ३०३(२), बीएनएस सह.क. ४८ (८), महा. ज.म.अधि. सह.४,२१ खाण ख.अधि., सह.क. ३ सार्व.संपत्ती नुक. अधि.गुन्हा नोंद करण्यात आली आहे.

### अवैध शस्त्र बाळगणाऱ्या अरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पो.स्टे. कन्हान** :— दिनांक २८/०१/२५ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशान्वये कन्हान पोलीस हे रात्रगस्त व कोबींग ऑपरेशन करीत असतांना गोपनिय माहीती मिळाली की खदान नं. ०६ येथे राहणारा इसम नामे अमित

ओमप्रकाश यादव याने सोशल मिडीयावर हातात तलवार घेवुन व्हीडीओ काढुन पोस्ट केला आहे.त्यामुळे लोकांच्या मनात भिती निर्माण झाली आहे.त्यानुसार पंचासमक्ष आरोपी यास विचारपुस केली आणि त्याची घरझडती केली असता आरोपीचे घरातुन एक धारदार लोखंडी तलवार एकुण लांबी २८.५ इंच, लोखंडी मुठ ४.५ इंच, धारदार पाते २४ इंच लांब ,१.५ इंच रूंद अंदाजे किंमत ५००रू. अशी मिळुन आल्याने सदर मुददेमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला.

**आरोपी नामे—** अमित ओमप्रकाश यादव वय २० वर्ष रा.खदान नं. ०६ कन्हान ता. पारशिवनी जि नागपुर याच्या विरूद्ध पोस्टे कन्हान येथे **कलम ४/२५ शस्त्र अधिनियम १९५९** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास कन्हान पोलीस करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर